नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd | अंक - १४३ | Issue - 143 | वार बुधवार दि. ९ ऑक्टोबर २०२४ | Blow- Wednesday Date 9 October 2024 | ई-पेपर - https://epaper.yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## थोडक्यात

### श्री विठ्ठल रूक्मिणी भक्तनिवासाच्या नावे बोगस बुकिंग घेणाऱ्यावर तक्रार दाखल

पंढरपूर : श्री विठ्ठल रूक्मिणी भक्तनिवासाच्या नावे खोल्या बुकींग करून भाविकांची आर्थीक फसवणूक करणाऱ्या अज्ञात व्यक्तीची तक्रार



पंढरपूर शहर पोलिस ठाणे येथे दाखल करण्यात आल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती पंढरपूरचे सर्व्हे नं ५९ येथे श्री विठ्ठल रूक्मिणी भक्तनिवास आहे. या भक्त निवासामध्ये खोली बुकींग साठी https://yatradham.org या संकेतस्थळावरून ऑनलाईन सुविधा उपलब्ध आहे. तसेच ऑफलाईन पध्दतीने काऊंटर बुकींग सुविधा देखील आहे. तथापि, श्री विठ्ठल रूक्मिणी भक्तनिवासाचे नावाने https://shrivitthalrukminibhaktaniwas.in/ असे बोगस (फेक) संकेतस्थळ (वेबसाईट) तयार करून त्यावरील मो.९०४५०३३७१९ वरून खोल्या बुकींग केल्या जातात असे सांगुन भाविकांचे पैसे स्विकारले आहेत. तसेच त्यांना त्याची पावती दिली गेली आहे, दि.०६/१०/२०२४ पासुन अशा भाविकांनी भक्तनिवास येथील दुरध्वनी वर संपर्क केला असता, सदर बाब निदर्शनास आली आहे. तसेच काही भाविक भक्तनिवास येथे प्रत्यक्ष वास्तव्यास आले असता. त्याबाबत फसवणूक झालेची माहीती मिळाली. यास्तव, यापूढे भाविकांची फसवणूक होऊ नये तसेच फसवणूक झालेल्या भाविकांना न्याय देण्याच्या दृष्टीने संबंधीतावर कायदेशीर कारवाई करण्याच्या दृष्टीने पोलिस ठाणे पंढरपूर शहर व https://cybercrime.gov.in/ यांचे कडे मंदिर समितीच्या वतीने लेखी तक्रार देणेत आली आहे. तरी भाविकांनी https://yatradham.org या संकेतस्थळावरून किंवा ऑफलाईन पध्दतीने खोली काऊंटर बुकींग करावे, असे आवाहन मंदिर समितीच्या वतीने व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी केले.

# हरियाणात भाजपची हॅट्ट्रीक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : हरियाणात काँग्रेसचा पराभव करत भारतीय जनता पक्षाने दणदणीत विजय मिळवला आहे. या विजयासह भाजपा हरियाणात तिसऱ्यांचा सरकार स्थापन करणार आहे. या निवडणुकीत भाजपला एकूण ४८, तर काँग्रेसला ३७ जागांवर विजय मिळाला आहे. महत्त्वाचे म्हणजे भाजपाने हरियाणात पूर्ण बहुमताचा आकडा पार केला असला तरी मुख्यमंत्री नायब सिंग सैनी यांच्या मंत्रीमंडळातील आठ मंत्र्यांचा पराभव झाला आहे. त्यामुळे राजकीय वर्तुळातही विविध चर्चांनाही उधाण आलं आहे.



हरियाणा विधानसभा निवडणुकीत भाजपाच्या आठ मंत्र्यांसह विधानसभा अध्यक्षांचा पराभव झाला आहे. यामध्ये कृषीमंत्री कंवरपाल गुर्जर, विकास आणि पंचायत राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) असीम गोयल, आरोग्य मंत्री कमल गुप्ता, अर्थमंत्री जय प्रकाश दलाल, क्रीडा राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) संजय सिंग, स्थानिक स्वराज्य संस्था राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) सुभाष सुधा, पाटबंधारे आणि जलसंपदा राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) अभयसिंग यादव, तसेच माजी मंत्री रणजित चौटाला यांचा समावेश आहे. या निवडणुकीत विधानसभा अध्यक्ष ज्ञानचंद गुप्ता यांच्याही पराभव झाला आहे.

अभयसिंग यादव यांना काँग्रेसच्या मंजू चौधरी यांनी ६ हजार ९३० मतांनी पराभूत केलं आहे. तर सुभाष सुधा यांना काँग्रेसच्या अशोक कुमार अरोरा यांनी ३ हजार २४३ मतांनी पराभूत केलं आहे. याशिवाय असीम गोयल यांना काँग्रेसचे उमेदवार निर्मल सिंग मोहरा यांनी ११ हजार १३१ मतांनी पराभूत केलं आहे. आरोग्य मंत्री कमल गुप्ता यांना अपक्ष उमेदवार सावित्री जिंदाल यांनी ३१ हजार ८४६ मतांनी पराभूत केलं आहे. कंवरपाल गुर्जर यांचा ६ हजार ८६८ मतांनी पराभव झाला आहे. तर जयप्रकाश दलाल यांचा केवळ ७९२ मतांनी पराभव झाला आहे. काँग्रेसचे राजबीर फर्टिया यांनी त्यांचा पराभव केला आहे. फारुख अब्दुल्ला यांनी माध्यमांशी बोलताना आगामी सरकार स्थापनेबाबत भूमिका स्पष्ट केली. दहा वर्षांनंतर लोकांनी आम्हाला बहुमताचा कौल दिला आहे. आमची अल्लाहकडे प्रार्थना आहे की आम्ही लोकांच्या अपेक्षा पूर्ण करू शकू. जम्मू-काश्मीरमध्ये आमचं सरकार म्हणजे पोलीस राज नसून लोकांचं राज्य असेल. आम्ही तुरुंगात असणाऱ्या निर्दोष लोकांना बाहेर काढण्याचा प्रयत्न करू. माध्यामांना स्वातंत्र्य असेल. हिंदू व मुस्लिमांमध्ये आपल्याला विश्वास निर्माण करावा लागेल. मला आशा आहे की जम्मू-काश्मीरला राज्याचा दर्जा पुह्ा मिळवून देण्यासाठी इंडिया आघाडीतील मित्रपक्ष आमच्यासोबत उभे राहतील. मला असं समजलंय की ओमर अब्दुल्ला मुख्यमंत्री होतील, असं फारुख अब्दुल्ला म्हणाले. दरम्यान, फारुख अब्दुल्ला यांनी हरियाणात काँग्रेसच्या पराभवाबाबत भाष्य केलं आहे. हरियाणात काँग्रेसचा पराभव झाल्याचं मला वाईट वाटतंय. मला वाटतं की त्यांच्या अंतर्गत वादामुळे हे सघळं घडलं, असंही फारुख अब्दुल्ला म्हणाले.

### ओमर अब्दुल्ला जम्मू-काश्मीरचे नवे मुख्यमंत्री




**जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणुकांमध्ये नॅशनल कॉन्फरन्स (एनसी) सर्वात मोठा पक्ष म्हणून पुढे येऊ लागला आहे. नॅशनल कॉन्फरन्स व काँग्रेस यांच्या आघाडीनं बहुमताचा आकडा पार केला असून ओमर अब्दुल्ला जम्मू-काश्मीरचे नवे मुख्यमंत्री होतील, हे आता स्पष्ट झालं आहे. ओमर अब्दुल्ला यांचे वडील व जम्मू काश्मीरचे माजी मुख्यमंत्री फारुख अब्दुल्ला यांनीच ही माहिती दिली आहे.**

जम्मू-काश्मीरमध्ये यंदाच्या निवडणुकीत अनुच्छेद ३७० आणि त्यानंतर राज्याचा दर्जा मिळवण्यातील राजकीय वाद या बाबी विशेष चर्चेत राहिल्या. या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाकडून यासंदर्भात मुद्दे मांडले जात होते. मात्र, जम्मू-काश्मीरमध्ये सत्ता स्थापनेपर्यंत भारतीय जनता पक्षाला पोहोचण्यात अपयश आलं.

### हरियाणाने द्वेषाला फटकारले, विकासाला बहुमत दिले; पीएम मोदींचा दिल्लीतून काँग्रेसवर हल्लाबोल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली : हरियाणाच्या विजय दिल्लीतील भाजप कार्यालयात मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. पंतप्रधान मोदी यांनी कार्यकर्त्यांना संबोधित केले यावेळी हरियाणातील मतदारांचे मोदींनी आभार मानले. पीएम मोदी म्हणाले, हरियाणाचा विजय हा कार्यकर्त्यांचा अथक प्रयत्नाचा विजय आहे. हरियाणाचा विजय जेपी नड्डा आणि पक्षातील कार्यकर्त्यांनी अहोरात्र घेतलेल्या मेहनतीचे फळ आहे. हरियाणातील जनतेने नवा इतिहास रचला आहे. कदाचित तुम्हाला पुर्ण माहिती नसेल. हरियाणाची स्थापना १९६६ मध्ये झाली. हरियाणावर बऱ्याच राज्यकर्त्यांनी राज्य केले. हरियाणात आतापर्यंत १३ वेळा विधानसभा निवडणुका झाल्या आहेत. प्रत्येक पाच वर्षांनी हरियाणातील मतदारांनी सत्तापालट केला आहे. पण पहिल्यादांचा हरियाणा सरकारने असा भाजपला तिसऱ्यांदा लोकांची सेवा करण्याची संधी दिली आहे. फक्त आम्हाला बहुमत मिळवुन सरकार स्थापन करण्यापुरता जनादेश नाही दिला तर हरियाणाच्या जनतेने आम्हाला २०१९ च्या तुलनेत यंदा जास्त जागा मिळवुन दिल्या आहेत असे गौरवउद्गार मोदींनी काढले.

पुढे मोदी म्हणाले, हरियाणात विकासाच्या मुद्द्यावर जनतेने भाजपला मतदान केले आहे. भाजपाने विकास केला म्हणून गुजरात आणि मध्यप्रदेशमध्ये एक शतकाहून अधिक भाजपचे सरकार बनले आहे. आसाम त्रिपुरा आणि उत्तराखंड मध्ये दोन टर्महून अधिक भाजपचे सरकार आहे. दुसरीकडे काँग्रेसची हालात मात्र वाईट आहे. फक्त एकदा आसामध्ये काँग्रेसचे सरकार आले होते. पण आता मागील दहा वर्षात कुठेच काँग्रेसचे सरकार आले नाही. देशात काँग्रेससाठी नो एन्ट्रीचा बोर्ड लागला आहे. सरकारमध्ये नसल्याने काँग्रेसची हालात बिघडली आहे.




**उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अक्कलकोट विधानसभा क्षेत्रातील विविध विकास कामांचे भूमिपूजन**

**उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन**

# देगाव शाखा कालवा अंतर्गतची कामे पूर्ण झाल्यानंतर १६ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार







**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
**अक्कलकोट/ कमलाकर सोनकांबळे**

भीमा उजनी प्रकल्प अंतर्गत देगाव शाखा कालवा वितरिका क्रमांक एक व वितरिका क्रमांक दोन अंतर्गत ३५२ कोटीच्या कमांचे भूमिपूजन झाले. ही कामे पूर्ण झाल्यानंतर दक्षिण सोलापूर तालुक्यातील दहा गावे व अक्कलकोट तालुक्यातील २५ गावांना लाभ होणार आहे. तसेच या दोन्ही तालुक्यातील गावांमधील एकूण १६ हजार १२९ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येऊन या भागातील शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळणार असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

श्री क्षेत्र अक्कलकोट येथील विविध विकास कामाचे भूमिपूजन व उजनीचे पाणी कुरनुर धरणात आल्याचे प्रीत्यार्थ जलपूजन प्रसंगी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मार्गदर्शन करत होते. यावेळी माजी खा. डॉ. जयसिद्धेश्वर महास्वामी, आमदार सुभाष देशमुख, आ. सचिन कल्याणशेट्टी, आ. समाधान आवताडे, आ. राम सातपुते, माजी आ. प्रशांत परिचारक, शहाजी पवार, यांच्यासह विविध गावचे सरपंच, सोसायटी चेअरमन, बाजार समिती संचालक, ग्रामपंचायत उपसरपंच, सदस्य, मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस पुढे म्हणाले की विविध विकास कामाचे उद्घाटन करताना एक समाधान होत आहे की या कामातून सर्वसामान्यांना लाभ मिळणार आहे. उजनीचे पाणी कुरनूर धरणात आणले त्यामुळे पिण्याचे व शेतीच्या पाण्याचे सोय झाली. २७ वर्षापासून बंद असलेली एकरूख योजना सुरू झाली. या योजनेमुळे दक्षिण सोलापूर व अक्कलकोट तालुक्यांना फायदा होत आहे. अक्कलकोट तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

**आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी प्रास्ताविक केले. यामध्ये ते म्हणाले की अक्कलकोट तालुक्याला मागील ७५ वर्षापासून पाणी मिळालेले नाही परंतु या योजनांच्या भूमिपूजनामुळे हा तालुका पाणीदार होणार असून येथील शेतकरी आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी बनेल असे त्यांनी सांगितले.**

सौर कृषी वाहिनी योजनेअंतर्गत राज्यातील शेतकऱ्यांना ३६५ दिवस वीज पुरवठा केला जाणार आहे. या अंतर्गत शेतकऱ्याला सौर कृषी पंप घेताना फक्त एकूण रकमेच्या दहा टक्के रक्कम भरावयाचे आहे उर्वरित ९०% रक्कम राज्य शासन देणार आहे. शेतकऱ्यांनी सौर कृषी पंप बसवल्यानंतर त्याच्या दुरुस्ती व देखभालीसाठी पुढील पाच वर्ष खर्च शासन करणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पुढील काळात त्यांना कृषी पंपाचे वीज बिल भरण्याचीच आवश्यकता राहणार नसल्याचे प्रतिपादन श्री. फडणवीस यांनी केले. राज्य शासन अनेक लोक कल्याणकारी योजना राबवत असून मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण योजना लेक लाडकी योजना मुलींना उच्च शिक्षणात शंभर टक्के शुल्क सवलत आदी योजनांच्या माध्यमातून सर्वसामान्यांना न्याय देण्याचा प्रयत्न शासन करत असल्याचे श्री. फडणवीस यांनी सांगितले.

प्रारंभी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देगाव शाखा कालवा अंतर्गत विविध विकास कामांचे भूमिपूजन केले. तसेच अमृत २.० योजनेअंतर्गत अक्कलकोट पाणीपुरवठा योजना, नगरोत्थान महा अभियानांतर्गत दुधनी शहर पाणीपुरवठा, मैंदर्गी पाणीपुरवठा, नगरोत्थान अंतर्गत अक्कलकोट शहरातील प्रमुख रस्त्यांच्या कामाचे भूमिपूजन, अक्कलकोट दुय्यम निबंधक श्रेणी एक मुख्य इमारतीचे भूमिपूजन, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना अंतर्गत टप्पा दोन कामाचे भूमिपूजन, पोलीस स्टेशनच्या नवीन इमारतीच्या कामाचे भूमिपूजनही यावेळी करण्यात आले.

## संपादकीय....

### निवडणुकीचा धुरळा

हरियाणात काँग्रेसचा पराभव करत भारतीय जनता पक्षाने दणदणीत विजय मिळवला आहे. या विजयासह भाजपा हरियाणात तिसऱ्यांचा सरकार स्थापन करणार आहे. या निवडणुकीत भाजपाला एकूण ४८, तर काँग्रेसला ३७ जागांवर विजय मिळाला आहे. महत्त्वाचे म्हणजे भाजपाने हरियाणात पूर्ण बहुमताचा आकडा पार केला असला तरी मुख्यमंत्री नायब सिंग सैनी यांच्या मंत्रीमंडळातील आठ मंत्र्यांचा पराभव झाला आहे. त्यामुळे राजकीय वर्तुळातही विविध चर्चांनाही उधाण आलं आहे. अभयसिंग यादव यांना काँग्रेसच्या मंजू चौधरी यांनी ६ हजार ९३० मतांनी पराभूत केलं आहे. तर सुभाष सुधा यांना काँग्रेसच्या अशोक कुमार अरोरा यांनी ३ हजार २४३ मतांनी पराभूत केलं आहे. याशिवाय असीम गोयल यांना काँग्रेसचे उमेदवार निर्मल सिंग मोहरा यांनी ११ हजार १३१ मतांनी पराभूत केलं आहे. आरोग्य मंत्री कमल गुप्ता यांना अपक्ष उमेदवार सावित्री जिंदाल यांनी ३१ हजार ८४६ मतांनी पराभूत केलं आहे. कंवरपाल गुर्जर यांचा ६ हजार ८६८ मतांनी पराभव झाला आहे. तर जयप्रकाश दलाल यांचा केवळ ७९२ मतांनी पराभव झाला आहे. काँग्रेसचे राजबीर फर्टिया यांनी त्यांचा पराभव केला आहे. जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणुकांमध्ये नॅशनल कॉन्फरन्स (एनसी) सर्वात मोठा पक्ष म्हणून पुढे येऊ लागला आहे. नॅशनल कॉन्फरन्स व काँग्रेस यांच्या आघाडीनं बहुमताचा आकडा पार केला असून ओमर अब्दुल्ला जम्मू-काश्मीरचे नवे मुख्यमंत्री होतील, हे आता स्पष्ट झालं आहे.

# आपल्या पत्रातील भावना मनाभावाच्या माणसापर्यंत पोहचविण्याचे साधन 'टपाल'

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

९ ऑक्टोबर हा पहिला जागतिक पोस्ट दिवस १९६९ मध्ये टोकियो, जपान येथे यूनिवर्सल पोस्टल यूनियन काँग्रेसमध्ये घोषित करण्यात आला. भारतीय शिष्टमंडळाचे सदस्य श्री आनंदमोहन नरुला यांनी हा प्रस्ताव सादर केला होता. तेव्हापासून टपाल सेवांचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी जगभरात जागतिक पोस्ट दिवस साजरा केला जातो. 'इंडिया पोस्ट' या ब्रँड नावाखाली व्यवहार करणारे टपाल विभाग ही भारतातली सरकारद्वारे संचालित अशी टपाल प्रणाली आहे, जी दळण-वळण मंत्रालयाची एक उपकंपनी आहे. १ ऑक्टोबर १८५४ रोजी ब्रिटिश भारतात लॉर्ड डलहौजी ह्यांनी आधुनिक भारतीय टपाल सेवेचा पाया रचला. डलहौजी ह्यांनी एकसमान टपाल दर (सार्वत्रिक सेवा) लागू केलेत आणि 'इंडिया पोस्ट ऑफिस ॲक्ट १८५४' मंजूर करीत लॉर्ड विल्यम बेंटिक ह्यांच्या भारतात टपाल विभागाची स्थापना करण्याविषयीच्या १८३७ च्या कायद्यात दुरूस्ती केली.

### जागतिक टपाल कार्यालय दिन

दरवर्षी ९ ऑक्टोबरला जागतिक टपाल दिन किंवा 'वल्ड पोस्ट डे' हा दिवस जगभरातून साजरा केला जातो. इंटरनेटच्या काळात आजही लोकं टपालसेवेचा वापर करतात आणि त्यावरचा लोकांचा विश्वास कायम आहे. एका शहरातून दुसरीकडे टपाल पाठविण्याचं सर्वात सोपं आणि स्वस्त साधन आहे ते म्हणजे पोस्ट सेवा. फक्त देशातच नाही तर जगातील कोणत्याही देशात टपाल पाठविण्यासाठी या सेवेचा लाभ घेता येतो. टपाल दिवस साजरा करण्याचा हेतू एवढाच कि, टपाल सेवा आणि त्यातील विभागांविषयी लोकांना जागरुक करणे होय. स्मार्टफोनच्या जमान्यात पत्र कोण पाठवेल? हा प्रश्न नक्कीच तुमच्या मनात देखील आला असेल. मात्र आजही भारतातील काही ठिकाणी पत्र हेच एकमेकांशी संपर्क करण्याचं साधन आहे. 'टपाल' हा इतिहासाचा मौल्यवान ठेवा, काळ बदलला तरी आजही त्याचे महत्व कायम आहे. एक काळ असा होता, जेव्हा लोक दिवस-रात्र पत्रांची वाट पाहत असे. मात्र बदलत्या काळाबरोबरच आणि तंत्रज्ञानाबरोबर मोबाईल, सोशल मीडियामुळे क्षणात कोणाशीही संवाद साधता येतो. मात्र आजच्या युवा पिढीला पत्र, पोस्टकार्ड आणि ग्रिटिंगचे महत्त्व हवे तेवढे वाटत नाही. एकेकाळी लोकांसाठी पत्र म्हणजेच सर्वकाही होतं.

जागतिक टपाल दिनाचा इतिहास

युनिवर्सल पोस्टल युनियन (युपीयु) ची उभारणी करण्यासाठी ९ ऑक्टोबर १८७४ मध्ये स्विर्झलंडची राजधानी 'बर्न' येथे २२ देशांनी मिळून करारावर सही केली होती. या घटनेच्या स्मृतीत टोकियोत १९६९ मध्ये आयोजित केल्या गेलेल्या संमेलनात ९ ऑक्टोबरला जागतिक टपाल दिन म्हणून घोषित करण्यात आले. १ जुलै १८७६ ला भारत 'युनिवर्सल पोस्टल युनियन' चा सदस्य होणारा पहिला आशियाई देश ठरला. बदलत्या काळासोबत जगातील सर्व टपाल सेवांनी त्यांच्या कार्यप्रणालीमध्ये आवश्यक बदल केले आहेत. नवीन तंत्रज्ञानासह टपाल सेवांनी स्वत: ला अधिक जलद केले आहे. डाक, पार्सल, पत्र हे एक्सप्रेसने जाण्याची सेवा सुरु झाली. जवळपास २५ वर्षांपूर्वी या बदलावांना सुरुवात झाली आणि सर्वच स्तरावर तांत्रिक बदल करण्यात आले. आता ऑनलाईन पोस्टल देवाण- घेवाणीवरही लोकांचा विश्वास वाढला आहे. 'युपीयु ने केलेल्या एका सर्वेमध्ये अशी माहिती समोर आली की जगभरातून आजच्या घडीला ६५ पेक्षा जास्त प्रकारच्या ई-पोस्टल सेवा उपलब्ध आहेत. सध्याच्या टपाल व्यवस्थेची सुरवात सतराव्या शतकात ईस्ट इंडिया कंपनीच्या काळात झाली. १६८८ मध्ये मुंबई आणि मद्रास इथे कंपनी पोस्टची कार्यालये स्थापन झाली. मात्र त्याद्वारे केवळ कंपनीच्या टपालाचीच ने-आण होई. वॉरन हेस्टिंग्ज हा बंगाल प्रांताचा गव्हर्नर असताना त्याच्याकडे मुंबई आणि मद्रास इलाख्याच्या देखरेखीचे अधिकार होते. त्या काळात १७७४ मध्ये टपालसेवा जनतेसाठी खुली करण्यात आली. पोस्टमास्टर जनरलची प्रथमच नियुक्ती करण्यात आली आणि टपालसेवेसाठी पैसे भरल्याचा पुरावा म्हणून धातूची टोकने टपालासोबत वापरायला सुरूवात झाली. सुरवातीच्या काळातील अडचणींवर मात करण्यासाठी सर्व प्रेसिडेन्सीं अंतर्गतची टपाल सेवा एकसूत्री असावी असा विचार पुढे आला. त्यातूनच पहिला भारतीय टपाल कायदा, १८३७ हा अस्तित्वात आला. त्यात पुढे बदल करून १८५४ चा टपाल कायदा अस्तित्वात आला. त्याद्वारे देशात टपाल सेवेचा एकाधिकार हा टपाल खात्याला देण्यात आला. २०११ पर्यंत त्यात बदल झालेला नाही. पैसे भरल्याचा पुरावा म्हणून धातूची टोकने मागे पडून, १ ऑक्टोबर १८५४ पासून चिकट पार्श्वभाग असलेली टपाल तिकिटे वापरात आली.



**– प्रवीण बागडे, नागपूर**
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com




१९७७ मध्ये भारतानं जाल कूपर यांचं टपाल तिकीट प्रसिद्ध केलं होतं. याचं कारणंही तसंच होतं. जाल कूपर हे टपाल तिकीट या विषयातील जागतिक पातळीवरचे अभ्यासक होते. मुंबईत पारशी कुटुंबात त्यांचा जन्म झाला. इंडियाझ स्टॅम्प जर्नलचे संपादन केले होते. भारतातील पहिल्या तिकीट संपादक ब्यूरोचे ते संपादक होते. त्यांनी इम्पायर ऑफ इंडिया फिलाटेलिक सोसायटीची स्थापना केली होती. याच विषयावर त्यांनी पुढे पुस्तकही लिहिलं. त्यांच्या छंदाला त्यांनी शास्त्रीय स्वरुप दिलं. भारतीय टपाल तिकीटांचा अभ्यास जागतिक पातळीवर नेण्यात त्यांचा मोठा वाटा आहे. टपाल तिकीट संग्राहक अशी कारकिर्दीची सुरुवात करुन जागतिक पातळी गाठणाऱ्या कूपर यांचे योगदान प्रचंड महत्वाचं आहे, हे त्यांच्यावर काढलेल्या तिकीटांवरुन लक्षात येतं. भारतात २३ टपाल क्षेत्रात विभागले गेले आहेत, प्रत्येक क्षेत्र चीफ पोस्टमास्टर जनरल यांच्या अध्यक्षतेखाली आहे. संपूर्ण देशासाठी 'डायरेक्टर जनरल ऑफ पोस्ट' हे प्रमुख पद आहे. युनिव्हर्सल पोस्टल युनियनने कार्यक्षम अशा टपाल सेवेचा मार्ग खुला केला, जी पुढे १९४८ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाची एक प्रमुख संस्था बनली. भारत स्वतंत्र झाल्यापासून ते आजपर्यंत टपाल तिकीटांच्या स्वरुपात, आकारात, रचनेत विविध बदल झालेत. त्यांच्यातील या बदलांमुळे त्या-त्या काळाविषयी माहिती मिळते. टपाल खाते नेते, फुलं, प्राणी-पक्षी, एखादी घटना, रौप्य, सुवर्ण, अमृतमहोत्सवी, शतक, द्विशतक किंवा त्रिशतकनिमित्त तिकीटं काढतं. १९४७ ला जेव्हा भारत स्वतंत्र झाला, त्यावेळी पोस्ट तिकीटात बदल करण्यात आला होता. त्या तिकीटावर तिरंग्याचे चित्र दिले होते, तर कधी इंदिरा गांधी, महात्मा गांधी, राजीव गांधी, सचिन तेंडुलकर यांच्या सारख्या थोर व्यक्तींच्या प्रतिमा टपाल तिकीटांवर विशेष काळात होत्या. यावरुन आपल्याला त्या काळात त्यावेळी घडलेल्या घटनांची माहिती मिळते. त्यामुळेच टपाल तिकीटे हा इतिहासाचा मौल्यवान ठेवा आहे.

हिमाचल प्रदेशमधील हिक्किम नावाच्या गावामध्ये जगातील सर्वात उंचावरील टपाल कार्यालय अर्थात पोस्ट ऑफिस आहे. ४४४० मीटर उंची जेथे श्वास घेण्यास अडचण येते, अशा ठिकाणी १९८३ पासून हे टपाल कार्यालय दुर्गम भागात पत्र पाठवण्याचे काम करते. हिक्किमच्या आजुबाजूच्या गावांचे संचाराचे एकमात्र साधन हे पत्र आहे. या टपाल कार्यालय हिक्किमबरोबरच लांगचा-१, लांगचा-२ आणि कॉमिक गावांमध्ये पत्र पोहचवण्याचे काम करते. बर्फामुळे जून ते ऑक्टोबरच्या काळात या ठिकाणी जाणे शक्य नसते. या टपाल कार्यालयात १९८३ पासून रिनचेन नावाची व्यक्ती पोस्टमनचे काम करत आहे. अनेकदा बर्फामुळे त्यांना घरी परतण्यास अडचणीचा सामना देखील करावा लागतो. तत्परतेने सेवा देणाऱ्या भारतीय टपाल विभागातील सर्वांना 'आंतरराष्ट्रीय टपाल दिना' निमित्त मनपूर्वक शुभेच्छा!

# कर्मवीर डॉ. वसंतराव पवार यांच्या कार्याचा इतरांनी आदर्श घ्यावा : मुख्याध्यापक वाजे




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर /प्रतिनिधी : डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात मराठा विद्या प्रसारक संस्थेचे भूतपूर्व सरचिटणीस कर्मवीर डॉ. वसंतराव पवार यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले. अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक रामदास वाजे होते. व्यासपीठावर जेष्ठ शिक्षक दिंगबर जाधव ,सोमनाथ पगार , सोमनाथ गिरी, कचेश्वर शिंदे,जयश्री गोहाड, राजेंद्र गांगुर्डे,विद्या ठाकरे आदी उपस्थित होते. उपस्थितांच्या हस्ते डॉ.पवार यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. विद्यार्थ्यांसह उपशिक्षक सोमनाथ गिरी यांनी डॉ. पवार यांच्या जीवन व कार्याचा आढावा घेतला.

यावेळी बोलताना कार्यक्रमाचे अध्यक्ष रामदास वाजे म्हणाले की,डॉ. पवार यांनी शिस्त ,गुणवत्ता व पारदर्शकता या त्रिसूत्रीवर मविप्र संस्थेचा कारभार केला. संस्थेच्या संख्यात्मक व गुणात्मक विस्तारासाठी त्यांनी अविरत प्रयत्न केले. डॉ. पवार यांचे मविप्र संस्थेसाठी दिलेले योगदान कोणीही विसरू शकत नाही.डॉ. पवार यांचे सामाजिक,सहकार,राजकीय,शैक्षणिक,वैद्यकीय साहित्य आदिंसह विविध क्षेत्रातील कार्य उल्लेखनीय असून त्यांच्या कार्याचा इतरांनी आदर्श घ्यावा असे आव्हान मुख्याध्यापक वाजे यांनी केले. सूत्रसंचालन शालेय सांस्कृतिक समितीचे प्रमुख पी.आर.करपे यांनी तर आभार सुनिल ससाणे यांनी मानले.यावेळी डी. ए.रबडे,रेवणनाथ कांगणे,सीमा गोसावी,उत्तम कामडी,वरिष्ठ लिपिक राणी शिंदे,रोहिणी भगत शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# स्वर्गीय आमदार भारत भालके यांचा फोटो लावण्याचा अधिकार प्रत्येक कार्यकर्त्याला आहे : मनसे नेते दिलीप धोत्रे

पंढरपूर, (प्रतिनिधी) : स्व. भारत भालके, स्व. वसंतदादा काळे. स्व. भीमराव महाडिक, यांच्या विचाराने तसेच त्यांचा आदर्श घेऊन कार्य करणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याला या नेत्यांचे फोटो लावून आंदोलन तसेच अन्य सामाजिक उपक्रमात सहभागी होण्यासाठी कोणाची परवानगी घ्यायची गरज नाही असे मनसे नेते दिलीप बापू धोत्रे यांनी आज पत्रकार परिषदेत सांगितले. कार्यकर्त्यांच्या जनसंवाद मेळाव्यामध्ये त्यांनी नामवलेख टाकून मनसे पक्षावर टीका केली या टीकेच्या प्रतिउत्तर देताना मनसे नेते दिलीप बापू धोत्रे यांनी वरील माहिती दिली. स्वर्गीय भारत भालके यांच्या २००७ या विधानसभेत निवडणुकीमध्ये विधानसभेच्या वतीने त्यांना निवडणूक लढवली होती त्यावेळी त्यावेळी पासून मी त्यांच्याबरोबर कार्य करीत आहे. त्यांच्या विचाराला अनुसरून व त्यांचा आदर्श समोर ठेवून मी माझे कार्य करीत आहे मला आदरणीय असलेले स्वर्गीय भारत भालके यांचा फोटो आज विधानसभेच्या निवडणुकीच्या पुढे मी लावत नसून यापूर्वी देखील मी असंख्य माझे कार्यक्रम हे स्वर्गीय भारत नाना भालके हे स्वर्गीय वसंतदादा काळे स्वर्गीय भीमराव महाडिक यांचे फोटो लावून मी माझे कार्य केलेले आहे आंदोलन केलेले आहे भारत नाना यांच्या विचाराचा वारसा पुढे घेऊन जाण्याचा अधिकार प्रत्येक कार्यकर्त्याला आहे असे मनसे नेते दिलीप बापू धोत्रे यांनी पत्रकार परिषदे मध्ये सांगितले.

# उत्तर नगर जिल्ह्याच्या शिवसेना सह संपर्कप्रमुख पदी अनिताताई जगताप यांची नियुक्ती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/शिर्डी : शिर्डीच्या शिवसेनेच्या प्रथम मा.नगराध्यक्षा सौ अनिताताई विजय जगताप यांची शिर्डी लोकसभा मतदारसंघ व उत्तर नगर जिल्ह्याच्या सह संपर्कप्रमुख पदी राज्याचे मुख्यमंत्री मा.ना.श्री एकनाथरावजी शिंदे साहेब यांच्या आदेशाने नियुक्ती करण्यात आली.

मागील काळातील शिवसेना पक्षाच्या उत्तर नगर जिल्हा प्रमुखपदी काम करीत असतांना संघटन कौशल्य व पक्ष वाढीसाठी अहोरात्र घेतलेले कष्ट या व अधिक कामांची दखल घेऊन मा.खा. श्री श्रीकांतजी शिंदे,सचिव श्री भाऊसाहेब चौधरी, पक्ष निरीक्षक श्री राजेंद्र चौधरी यांचे शिफारशीवरून सौ अनिताताई जगताप यांना सह संपर्कप्रमुख पदी निवडण्यात आले. सौ अनिताताई जगताप ह्या तळागाळातील नागरिकांचा दांडगा संपर्क ठेवून असतात. नगराध्यक्ष पद सांभाळताना शिर्डी शहरात अनेक विकासकामे केली. व जनतेचे प्रश्न सोडविले. त्याच्या कार्यकालात शिर्डी नगरपालिकेमध्ये सर्व प्रथम हळदी कुंकू समारंभ सुरू केला. नगरसेविका व नगराध्यक्षा होण्याअगोदर छत्रपती मित्र मंडळ या सामाजिक संघटनेच्या माध्यमातून सार्वजनिक श्री गणेशोत्सव , श्री नवरात्र उत्सव, श्री शिवजयंती उत्सव , व्यापक स्वरुपात हळदी कुंकू तसेच महिलांसंदर्भात अनेक कार्यक्रम राबवित आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकी विलंबामुळे शिर्डी नगरपालिकेमध्ये उदासीन वातावरण निर्माण झाले आहे. प्रायोजित सर्व कामांना कात्री लागली गेली आहे. परंतु छत्रपती मित्र मंडळाचे माध्यमातून महिलांचे सामाजिक, शैक्षणिक ,आर्थिक दृष्ट्या सबलीकरण संदर्भात सर्व कामे सौ अनिताताई जगताप वर्षानुवर्ष करीत आहेत. जिल्हा प्रमुख असताना सहा तालुक्याचे कामकाज पक्ष वाढीसाठी तसेच महिलांच्या सर्व प्रश्नासंदर्भात जुना अनुभव नक्कीच फलदाई ठरेल यात शंका नाही.

अशा एक ना अनेक कामांची पावती म्हणुन सौ अनिताताई जगताप यांना नुकताच प्रहार वृत्त समूहाचे वतीने राज्यस्तरीय जिवन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच लायन्स , लॉयनेस क्लब, तसेच जिल्ह्यातील विविध सामाजिक संघटनांच्या वतीने विविध पुरस्कार प्रदान करण्यात आले.

नगराध्यक्षा काळात महाराष्ट्र शासनाच्या वतीने स्वच्छ शिर्डी-सुंदर शिर्डी पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.



मुख्यमंत्री लाडकी बहीण योजने संदर्भात छत्रपती मित्र मंडळ आयोजित श्री गणेशोत्सव काळात राज्याचे महसूल व पालक मंत्री व छत्रपती मित्र मंडळ व श्री विजयराव जगताप पा. परिवारावर विशेष स्नेह असणारे मा.नामदार श्री राधाकृष्णजी विखे पाटील उपस्थित नागरिक व महिलांशी संवाद साधत असतांना संघटना व जगताप पाटील परिवार याचे सोबत गेल्या वीस बावीस वर्षापासुन स्नेहाचे संबंध आहेत, अशा अनेक जुन्या आठवणी व कार्यकर्त्यांच्या नामोल्लेख करीत आठवणीना उजाळा दिला. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेत ज्या महिलांना लाभ मिळाला नसेल त्यांना लवकरच लाभ मिळेल अशी ग्वाही दिली. या संदर्भात सौ अनिताताई जगताप आपणांस योग्य ते मार्गदर्शन करतील असे नामदार श्री विखे पाटलांनी उपस्थित महिलांना सांगितले.

शिवसेना पक्षाच्या वतीने निवड झाल्याने सह संपर्कप्रमुख सौ अनिताताई विजय जगताप पा.यांनी राज्याचे मुख्यमंत्री मा.नामदार श्री एकनाथरावजी शिंदे साहेब तसेच खासदार मा.श्री श्रीकांतजी शिंदे, सचिव मा. श्री भाऊसाहेब चौधरी, पक्ष निरीक्षक मा.श्री राजेंद्रजी चौधरी यांचे आभार मानले. तसेच पक्षवाढीसाठी व महिलांच्या सर्व प्रश्नाबाबत दिलेल्या संधीचे सोने करून दाखवू असा निर्धार सौ अनिताताई जगताप यांनी व्यक्त केला.

सौ अनिताताई जगताप यांना शिर्डी लोकसभा मतदारसंघच्या शिवसेना पक्षाच्या सह संपर्कप्रमुख पदी नियुक्ती झाल्याबद्दल श्रीरामपूरचे माजी आमदार श्री भाऊसाहेबजी कांबळे. तसेच जिल्हा प्रमुख श्री राजेंद्रजी देवकर पा. जिल्हा संघटक श्री विजयराव काळे पा.महिला आघाडी जिल्हाप्रमुख सौ सुनीताताई शेळके ,राहाता तालुका प्रमुख सौ अर्चनाताई निभे, उपप्रमुख सुकेशनी गायके,कोपरगाव तालुका प्रमुख सौ मीनाक्षीताई वाकचौरे ,उपप्रमुख आरती गाढे, शहर प्रमुख सौ विजया धोंड,कोल्हार शहर प्रमुख सौ पुजाताई सोमवंशी व महिला आघाडीच्या असंख्य महिलांनी सौ जगताप ताईचा सत्कार करुन शुभेच्छा दिल्या.

# शिक्षणशास्त्र व विस्तार विभागात संयुक्त जयंती साजरी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे/प्रतिनिधी : शिक्षणशास्त्र व विस्तार विभागात महात्मा गांधीजी, लाल बहादूर शास्त्री, शहीद भगतसिंग, कर्मवीर भाऊराव पाटील आणि प्रबोधनकार ठाकरे याची संयुक्त जयंती कार्यक्रम पार पडला.

शिक्षणशास्त्र व विस्तार विभागात संयुक्त जयंती कार्यक्रम पार पडला.या कार्यक्रमास प्रा. डॉ. विलास आढाव, प्रा. डॉ. प्रभाकर देसाई, प्रा.डॉ गीता कल्याणी शिंदे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. विद्यार्थी सर्वांगित विकास, मानवी मूल्यांची रुजवणुक आणि महापुरुषांच्या विचारांचा प्रसार या कार्यक्रमाचा मूळ उद्देश असतो, विभागाद्वारे असे विविध कार्यक्रम पार पाडले जातात.

आजच्या कार्यक्रमात डॉ. विलास आढाव यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले, महात्मा गांधीजी यांचे विचार आपण आपल्या वर्तनात आणून सक्षम मनुष्य निर्माण करू शकतो अशा साराचे मार्गदर्शन डॉ. प्रभाकर देसाई यांनी केले, विचार आणि माहितीवर आपण होणाऱ्या शिक्षकांनी गंभीर विचार करून पुढे समाज परिवर्तनासाठी हातभार लावावा असं समारोपपर आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केला.

कार्यक्रमात १२ विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष सहभाग नोंदवला आणि पूर्वनियोजन सहित कार्यक्रम यशस्वी पार पाडला, बी. एस.सी बी.एड, एम्.एड, शिक्षणशास्त्र पदव्युत्तर वर्गातील १००+ विद्यार्थी , या व्यतिरिक्त शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी या कार्यक्रमास उपस्थीत होते.

शास्वतता,निसर्ग आराधना या महत्वाच्या बाबी विभागाकडून नेहमी समोर ठेवल्या जातात, वृक्षाला पाणी घालून कार्यक्रमाची सुरुवात होणे या विभागाच्या परंपरा नेहमी एकमेव ठरतात. डॉ. गीता कल्याणी शिंदे यांनी विभागप्रमुख या नात्याने विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर मार्गदर्शन केले, प्रत्येकवेळी नवीन विद्यार्थ्यांना प्रेरित करून व प्रोत्साहित करून सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी सर्व शिक्षक प्रेरित करतात आणि विभाग यासाठी सदैव तत्पर आहे, असं आपल्या वक्तव्यात त्या म्हणाल्या. सदर कार्यक्रमाचे आयोजन आणि नियोजन शिक्षक प्रतिनिधी राहुल गायकवाड आणि विद्यार्थी सम्राट पवार, संस्कृती देशपांडे,रागिणी ठाकरे, मानसी कुंभार यांनी केलेले असून विभागातील कार्यक्रम हे विद्यार्थ्यांचेच असतात आणि विद्यार्थ्यांच्या सहकार्याने ते पार पाडले जातात.

सर्व सहभागी विद्यार्थी , शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या आभार प्रदर्शन नंतर या कार्यक्रमाची औपचारिकरीत्या सांगता झाली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### हॉस्पिटलचे बिल भरण्यासाठी आणलेली रक्कम चोरली

सोलापूर (प्रतिनिधी) हॉस्पिटलचे बिल भरण्यासाठी आणलेली रक्कम बँकेचे पासबुक,पॅन कार्ड हे अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना ७ ऑक्टोंबर रोजी दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास बाबीवेस टिळक चौक येथे घडली.याप्रकरणी कलावती दासू राठोड (वय-५०,रा.गणेश नगर,कोडोतांडा) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेची हकीकत अशी की,फिर्यादी व फिर्यादी यांचा नातू विघ्नेश राठोड याला डिस्चार्ज देणार असल्याने डॉक्टर नितीन राठी हॉस्पिटल येथे बिल भरण्यासाठी गेले असता त्यांच्या हातातील लेडीज पर्समधील कॅरीबॅग मध्ये ठेवलेली ३२ हजार ४०० रुपये रोख रक्कम सेंट्रल बँकेचे पासबुक समर्थ बँकेचे पासबुक व पॅन कार्ड हे अज्ञात चोरट्याने नकळतपणे पर्सची चैन खोलून चोरून नेले आहे.असे फिर्यादीत नमूद आहे. तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल शिवशरण हे करीत आहेत.

### आसरा चौकात अपघात ; अज्ञात रिक्षाचालकावर गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) आसरा चौकात झालेल्या अपघात प्रकरणी अज्ञात रिक्षाचालका विरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हि घटना ६ ऑक्टोबर रोजी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास घडली.याप्रकरणी आश्विनी नीलकंठ म्हेत्रे (वय-३२,रा.मु. पो कुमठे) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात रिक्षाचालका विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की,वरील ठिकाणी अज्ञात एका रिक्षा चालकाने त्याच्या ताब्यातील रिक्षा अचानकपणे उजव्या बाजूने इंडिकेटर न देता टर्न मारून फिर्यादी यांना धडक देऊन त्यांच्या हाताचे हाड फ्रॅक्चर केले.तसेच दोन्ही गुडघ्यांना डोळ्यांना मार लागला असून,अपघाताची खबर पोलिसांना न देता निघून गेला आहे.असे फिर्यादीत नमूद आहे. तपास पोहेकॉ. बहिर्जे हे करीत आहेत.

### उपमुख्यमंत्र्यांचा ताफा अडवल्याप्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल

सोलापूर (प्रतिनिधी) उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा ताफा विमानतळ ते आसरा चौकाकडे जात असताना मजरेवाडी येथील क्रॉस रोड जवळ ताफा आडवून स्वतः चे व इतरांचे व्यक्तिगत सुरक्षितता धोक्यात आणण्याची कृती करून मोठ-मोठ्याने धनगर आरक्षण मिळालेच पाहिजे अशा घोषणा देऊन भंडारा उधळून सरकारी कामात अडथळा निर्माण केला असल्याची फिर्याद पोलीस कॉन्स्टेबल सुभाष मुंढे (नेमणूक गुन्हे शाखा,सोलापूर शहर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून शेखर उर्फ संकेत चंदन बंगाळे (वय-३०,रा. उत्तर सदर बाजार) व आकाश महादेव पुजारी (वय-२६,मु. पो. आरळी,ता.मंगळवेढा यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.हि घटना ७ ऑक्टोंबर रोजी दुपारी अडीच वाजण्याच्या दरम्यान घडली. तपास पोसई.तरंगे हे करीत आहेत.

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना पुढील पाच वर्ष चालू राहील : उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना वचनपूर्ती सोहळा थाटात संपन्न; समाजातील प्रत्येक घटकाला न्याय देण्यासाठी शासन कटिबद्ध : उपमुख्यमंत्री अजित पवार**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : राज्य शासनाने महिलांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्यासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केलेली आहे. राज्यातील २ कोटी २० लाख बहिणींच्या खात्यात थेट पैसे जमा झा-लेले आहेत. महिलांच्या सक्षमीकरणांचा विचार प्रथम या शासनाने केलेला असून त्याचा लाभ राज्यातील लाडक्या बहिणींना मिळत असल्याने त्यांना एक प्रकारचा आनंद व समाधान मिळत आहे. हा आनंद व समाधान टिकून राहण्यासाठी शासन ही योजना कोणत्याही अडचणी शिवाय पुढील पाच वर्ष चालू ठेवणार असल्याची ग्वाही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना वचनपूर्ती सोहळा अंतर्गत होम मैदान येथे आयोजित जिल्हास्तरीय कार्यक्रमात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मार्गदर्शन करत होते. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, माजी खासदार जय सिध्देश्वर स्वामी, आमदार सर्वश्री विजयकुमार देशमुख, सुभाष देशमुख, राजेंद्र राऊत, समाधान आवताडे, सचिन कल्याणशेट्टी, संजय शिंदे, शहाजी बापू पाटील, राम सातपुते, माजी आमदार प्रशांत परिचारक, दीपक साळुंखे पाटील, श्री. शिवाजी सावंत, महावितरण चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, सोलापूर महापालिका आयुक्त शितल उगले तेली, सोलापूर शहर पोलीस आयुक्त एम. राजकुमार, जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, मुख्यमंत्री जनकल्याण कक्षाचे डॉ. अमोल शिंदे, ज्योती वाघमारे, निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस पुढे म्हणाले की, या योजनेअंतर्गत लाडक्या बहिणींना जून जुलै चे प्रति महा पंधराशे रुपये प्रमाणे पैसे थेट त्यांच्या बँक खात्यावर जमा झालेले आहेत. भाऊबीज नोव्हेंबर महिन्यात येत असल्याने राज्य शासनाने विचार करून याच महिन्यात भाऊबीज म्हणून थेट नोव्हेंबर महिन्याचे पैसेही बहिणींच्या बँक खात्यात जमा केलेले आ-हेत. या योजनेविषयी कोणी कितीही काही सांगितले तरी आम्ही ही योजना बंद करणार नसल्याची ग्वाही यावेळी त्यांनी दिली.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने देशभरात लखप-ती दीदी ही योजना सुरू केलेली असून या योजनेच्या माध्यमातून लाखो महिला स्वतःचा व्यवसाय सुरू करून लखपती होत आहेत. त्याच धर्तीवर राज्य शासन ही महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने योजना राबवत असून पहिल्या टप्प्यात राज्यात २५ लाख लखपती दिदी तयार करण्यात येणार आहेत, तर राज्यात १ कोटी लखपती दीदी तयार करून प्रत्येक महिला वर्षाला किमान एक लाख रुपये स्वतः कमवतील यासाठी शासन प्रयत्न करत असल्याचे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले

**४० हजार महिला लाभार्थ्यांची तर ५५० महिला सरपंचाची उपस्थिती लक्षवेधक**

राज्यातील सर्व उपसा योजनांचे सौरऊर्जीकरण करण्यात येणार असून यासाठी ३ हजार ३६६ कोटीचा निधी मंजूर करण्यात आलेला आहे. या माध्यमातून राज्यातील सर्व शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीपंपासाठी दिवसा वीज देण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. त्यामुळे राज्यातील सिंचन सुविधा असलेल्या शेतकऱ्यांना याचा मोठ्या प्रमाणावर लाभ मिळणार आहे. मगेल त्याला सौर कृषी पंप योजनेअंतर्गत दहा टक्के रक्कम शेतकऱ्यांनी भरून सौर पंप बसवून देण्यात येणार असल्याने पुढील २५ वर्ष विजेचा खर्च शेतकऱ्यांना येणार नाही. तसेच मुलींना उच्च शिक्षणात शंभर टक्के फी माफी, लेक लाडकी योजनेअंतर्गत मुलगी जन्मताच मुलीच्या नावावर शासन पैसे टाकत आहे, एसटी बस मध्ये महिलांना तिकीटामध्ये ५०% सवलत देण्यात आ-लेली आहे, अशी माहिती श्री. फडणवीस यांनी दिली.

**समाजातील प्रत्येक घटकाला न्याय देण्यासाठी शासन कटिबद्ध : उपमुख्यमंत्री अजित पवार**

राज्य शासन समाजातील प्रत्येक घटकाला न्याय देण्यासाठी विविध कल्याणकारी योजना राबवत आहे. यामध्ये मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सर्वात लोकप्रिय ठरली आहे. ही योजना बंद पडणार नाही आपल्या राज्याची आर्थिक परिस्थिती सक्षम असल्याने पुढील काळात ही योजना अशीच चालू राहील. तसेच उपसा सिंचन योजनेचे सौरऊर्जीकरण करण्यात येत असून त्याचा फायदा शेतकऱ्यांना मिळणार आहे. तसेच शेतकऱ्यांसाठी विज बिल माफी योजना आणलेली असून या अंतर्गत राज्यातील ४४ लाख शेतकऱ्यांना १५ हजार कोटींची वीज बिल माफी देण्यात आल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

राष्ट्र निर्मितीमध्ये महिलांचे स्थान व योगदान खूप मोठे आहे. भारतीय संस्कृतीमध्ये स्त्रीला शक्तीचे रूप मानले जाते. त्यामुळे राज्यातील सर्वसामान्य महिलांना आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी बनवण्यासाठी शासनाने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना राबवण्यास सुरुवात केली. तसेच महिलांना वर्षातून तीन मोफत गॅस सिलेंडर देण्याची योजनाही सुरू आहे त्यामुळे राज्यातील महिला समाधानी असून लाडकी बहीण योजनेतून ते आपले व्यवसाय सुरू करून आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी होण्यासाठी प्रयत्न करत असल्याचे श्री पवार यांनी सांगितले. राज्य शासनाने कांदा निर्यात बंदी उठवली तसेच तांदूळ निर्यात बंदी ही उठवली आहे. दुधाला सप्टेंबर २०२४ मध्ये पाच रुपये प्रति लिटर वाढ देण्यात आलेली होती त्यात ७ रूपये वाढ करून प्रतिलिटर ३५ रुपये दुधाचा भाव ठरवून देण्यात आलेला आहे. शासन सर्वसामान्य व शेतकऱ्यांचे असल्याने त्यांच्या हितासाठी अधिक लक्ष दिले जात आहे. पोलीस पाटील व कोतवाल यांचे मानधन दुप्पट करण्यात आले. अशा सेविका, गटप्रवर्तक व अंगणवाडी सेविका यांच्या मानधनात भरघोस वाढ करण्यात आली. सरपंच, उपसरपंचाचे मानधनात ही दुप्पट वाढ करण्यात आली. अशा प्रकारे हे शासन सर्वसामान्यांना न्याय देण्यासाठी कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन श्री. पवार यांनी यावेळी केले.

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी प्रास्ताविक केले. यामध्ये माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत जिल्ह्यात दहा लाख ७० हजार महिलांचे अर्ज प्राप्त झालेले असून सात लाख दोन हजार महिलांच्या बँक खात्यावर पैसे जमा झाल्याची माहिती त्यांनी दिली. या योजनेचा उद्देश सांगून त्यांनी जिल्हा प्रशासनाने ही योजना राबवण्यासाठी केलेल्या कार्यवाहीची माहिती दिली. तसेच मुख्यमंत्री महोदय यांची अचानक तब्येत ठीक नसल्याने तर पालकमंत्री चंद्रकांत पाटील महत्त्वपूर्ण बैठकीसाठी मुंबई येथे असल्याने या कार्यक्रमास येऊ शकले नाहीत परंतु त्यांनी या कार्यक्रमासाठी शुभेच्छा दिल्याची माहिती त्यांनी दिली.

प्रारंभी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे कार्यक्रमाच्या ठिकाणी आगमन झाले.




व्यासपीठावर ते चालत येत असताना दोन्ही बाजूच्या उपस्थित शेकडो महिलांनी दोन्ही उपमुख्यमंत्री महोदयांना राख्या बांधल्या व ही योजना अशीच निरंतर चालू ठेवण्याची मागणी केली. त्यानंतर व्यासपीठावर मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास तसेच राजमाता जिजाऊ पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व रमाईमाता यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

जिल्हा प्रशासनाने माझी लाडकी बहीण योजना व जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या विविध उपसा सिंचन योजना तसेच अन्य योजनेच्या अनुषंगाने तयार करण्यात आलेली चित्रफितीचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते झाले.

**उपसा जलसिंचन योजनांच्या सौरऊर्जीकरण प्रकल्पाचे भूमिपूजन**

राज्यातील २४२ शासकीय व सहकारी उपसा जलसिंचन योजनांच्या सौर ऊर्जीकरण प्रकल्पांचे भूमिपूजन उपमुख्यमंत्री व ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आले. त्याचसोबत मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेतील वीज शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी पायाभूत वीज वितरण यंत्रणेच्या सक्षमीकरण व विस्तारीकरणासाठी २ हजार ७७३ कोटी रुपयांच्या विविध कामांचा शुभारंभ करण्यात आला.

**लाडक्या बहिणींना धनादेश वाटप–**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत जिल्ह्यातील पात्र ठरलेल्या सर्व लाभार्थ्यांना एकूण ४८१ कोटी रुपये वाटप करण्यात आलेले आहेत, त्याचा धनादेश प्रातिनिधिक स्वरूपात १५ महिला लाभार्थ्यांना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. तसेच पिंक ई-रिक्षा, लेक लाडकी योजना, मोफत गॅस सिलेंडर यासह अन्य योजनेच्या महिला लाभार्थ्यांनाही धनादेश व प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.

**प्रशासनाच्या वतीने नेटके आयोजन–**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना वचनपूर्ती सोहळा समारंभाचे जिल्हा प्रशासनाच्या वतीने अत्यंत नेटके आयोजन करण्यात आलेले होते. जवळपास ४० हजार महिलांना त्यांच्या गावातून ने - आण करण्यासाठी साडेतीनशे पेक्षा अधिक बसेसची व्यवस्था करण्यात आलेली होती. पार्किंगची व्यवस्था, महिलांना जेवणाची व्यवस्था, पाण्याची व्यवस्था, कायदा व सुव्यवस्था अत्यंत चोख ठेवण्यात आ-लेली होती. जिल्हा प्रशासन प्रमुख म्हणून जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद हे प्रत्येक बाबींवर अत्यंत बारकाईने लक्ष ठेवून स्वतःच्या नियंत्रणाखाली सर्व कामे व्यवस्थितपणे करून घेत असल्याने हा कार्यक्रम अत्यंत यशस्वीपणे पार पडलेला आहे.

**श्रमिक पत्रकार संघाच्या वतीने उपमुख्यमंत्री महोदय यांचा सत्कार–**

सोलापूर जिल्हा श्रमिक पत्रकार संघाच्या वतीने त्यांच्या गृहप्रकल्पाला राज्य शासनाने विशेष बाब म्हणून सात कोटीचा निधी दिलेला आहे. त्या अनुषंगाने श्रमिक पत्रकार संघाच्या वतीने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा श्री स्वामी समर्थ महाराजांची मूर्ती, शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे यांच्यासह त्यांचे पदाधिकारी उपस्थित होते.

## जिल्हाधिकारी आशीर्वाद यांचा सत्कार



**मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना जिल्ह्यात अत्यंत प्रभावीपणे राबवण्यात जिल्हा प्रशासन प्रमुख म्हणून जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद त्यांनी खूप मेहनत घेतलेली होती. तसेच हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी ही त्यांनी प्रत्येक गोष्टीवर अत्यंत बारकाईने लक्ष ठेवून हा कार्यक्रम यशस्वी केला. यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते त्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. त्याप्रमाणे महापालिका क्षेत्रात या योजनेअंतर्गत उत्कृष्ट काम केल्याबद्दल सोलापूर महापालिका आयुक्त शितल तेली उगले, तर ग्रामीण भागात चांगले काम केल्याबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी महत्वाची भूमिका बजावल्याबद्दल पोलीस शहर आयुक्त एम राजकुमार व पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनाही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले.**

**अन्नछत्र देवस्थानच्या वतीने उपमुख्यमंत्र्यांचा सत्कार** | **उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

# अन्नछत्र हे आम्हा फडणवीस कुटुंबियांचे श्रद्धास्थान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यास गेल्या ३७ वर्षातील उल्लेखनीय कार्यामुळे आज न्यासाचे नांव सातासमुद्रापार केले असून, महाप्रसादाच्या सेवेबरोबरच विविध उपक्रम हे धाडशी नेतृत्व व प्रबळ इच्छाशक्तीमुळेच प्रचंड विस्तार होत आहे. अन्नछत्र हे आम्हा फडणवीस कुटुंबियांचे श्रद्धास्थान असल्याचे मनोगत राज्याचे उपमुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले.



ते श्रीक्षेत्र अक्कलकोट येथील स्वामी समर्थ अन्नछत्र (ट्रस्ट) मंडळात आले असता, न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची मूर्ती, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला, यावेळी ते बोलत होते.

पुढे बोलताना उपमुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस म्हणाले की, फडणवीस कुटुंबीय आम्ही श्रीक्षेत्र अक्कलकोट निवासी स्वामी भक्तच, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ, हे स्वामींची प्रचितीच आहे. श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ हे गेली ३७ वर्ष सातत्याने महाप्रसाद वाटपाची जवाबदारीने व अत्यंत भक्ती भाव-ाने पार पाडली आहे. आज अन्नछत्र मंडळाच्या भविष्यातील विस्तारित अतिभव्य प्रसादालायाचे संकल्प रेखा चित्र बघायला मिळाले. ते अतिशय उत्तम असून,अक्कलकोटमध्ये येणाऱ्या प्रत्येक भाविकाची काळजी घेऊन, पुढील २५ ते ५० वर्षात तीर्थक्षेत्र अक्कलकोटचा होणाऱ्या विकासाचा मागोवा घेऊन रेखाचित्र बनविलेला आहे. या प्रकल्पामुळे श्रीक्षेत्र अक्कलकोटच्या वैभवात भर पडणार आहे. या प्रकल्पास माझ्या खूप खूप शुभेच्छा..!

दरम्यान मंडळाच्या वतीने नव्याने बांधण्यात येणाऱ्या महाप्रसाद गृहाच्या वास्तूची संपूर्ण माहिती ना. देवेंद्र फडणवीस यांना न्यासाचे वास्तुविशारद योगेश अहंकारी यांनी दिली. याप्रसंगी त्यांच्या समवेत दक्षिण सोलापूरचे आमदार सुभाष (बापू) देशमुख, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार राम सातपुते, आमदार समाधान अवताडे, ना. देवेंद्र फडणवीस यांचे खाजगी सचिव दिलीपराव राजूरकर, स्वीय सहायक मनोज मुंडे, भाजपा माजी भाजपा जिल्हाध्यक्ष शहाजी पवार, महेश हिंडोळे, राजकुमार झिंगाडे हे उपस्थित होते.

यावेळी न्यासाचे सचिव शामराव मोरे, विश्वस्त संतोष भोसले, अॅड.संतोष खोबरे, लेखापरीक्षक ओंकारेश्वर उटगे, वास्तुविशारद योगेश अहंकारी, मनोज निकम, न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी, बाळासाहेब पोळ, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, एस.के.स्वामी, बाळासाहेब घाडगे, कल्याण देशमुख, दत्ता माने, निखील पाटील, गोटू माने, प्रविण घाडगे, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, विठ्ठल रेड्डी, यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.




# इंडियन मॉडेल स्कूलच्या १९ विद्यार्थ्यांचे विभागीय तलवारबाजी स्पर्धेसाठी निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट /प्रतिनिधी : जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय सोलापूर व क्रीडा संचलनालय पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सोलापुर क्रीडा संकुल येथे घेण्यात आलेल्या १४. १७व १९ वर्षाखालील जिल्हास्तरीय तलवारबाजी स्पर्धेत इंडियन मॉडेल स्कूलचे १९ विद्यार्थ्यानी यश संपादन करत विभागीय स्पर्धेसाठी निवड झाले.

या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

या विद्यार्थ्यांना शाळेचे क्रीडा शिक्षक दयानंद दणूरे, सहशिक्षक संतोष सोनकंटले तलवारबाजी प्रशिक्षक पवित्रा पाटिल,व निर्जला तवार, यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल शाळेचे संस्थापक अध्यक्ष सिद्धाराम म्हेत्रे, संस्थेचे उपाध्यक्ष अमोल जोशी,सायली जोशी,संस्थेचे सचिव शीतलताई म्हेत्रे, बीएड महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ गणपती वाघमोडे, मुख्याध्यापिका गौरी दातार,यांच्यासह मान्यवरांनी तलवारबाजी स्पर्धेत यश संपादन केलेल्या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

यामध्ये १४ वर्षा खालील मुलाच्या गटात इर्शाद मेलीनमनी, आयान बळुर्गे, अरहान कोरबू, १४ वर्षा खालील मुलीच्या गटात- आदित्य बिराजदार, बुशरा गैर, १७ वर्षाखालील मुलांच्या गटात- सम्यक शहा, मंगेश होटकर, मेघराज म्हेत्रे, व १७ खालील मुलींच्या गटात- ऐश्वर्या सुतार, दानेश्वरी स्वामी, स्वामिनी कोकणे, नियती पटेल, दुर्वांकिता काटगाव ऋतुजा कस्तुरे., १९ वर्षाखालील मुलांच्या गटात- आमिर दर्जी, शाहिद मुजावर तौसिफ पिरजादे, १९ मुलींच्या गटात प्रतीक्षा भोसले यांचा समावेश आहे. या विद्यार्थ्यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली.

## थोडक्यात...

### दारू पिण्यास पैसे न दिल्याने पतीने पत्नीच्या डोक्यात दगड घालून केला खून

सोलापूर (प्रतिनिधी) दारू पिण्याकरिता पैसे न दिल्याच्या कारणावरून पतीने-पत्नीच्या डोक्यात दगड घालून जीवे ठार मारून खून केल्याप्रकरणी पतीविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.राजश्री तुळजाराम गुजराती (वय-२७,रा.अविनाश नगर,सुशील नगर जवळ,एमआयडीसी) असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे. याप्रकरणी राजश्री यांचा भाऊ खाजा भिमराव विटकर (वय-३४,रा. साईबाबा चौक) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.त्यांच्या फिर्यादी वरून फिर्यादीचे भाऊजी तुळजाराम मनोहर गुजराती (वय-३३,रा.अविनाश नगर,सुशील नगर जवळ,एमआयडीसी) याच्याविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे.असे फिर्यादीत नमुद आहे.ही घटना ७ ऑक्टोंबर रोजी रात्री सव्वा दहा ते साडेदहाच्या दरम्यान अविनाश नगर,सुशील नगर जवळ डॉ.सदाफुले यांच्या दवाखाना शेजारी एमआयडीसी येथे घडली. घटनेचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक चंदनशिवे हे करीत आहे.

# पंढरपूर विधानसभा मतदार संघात नवीन २० मतदान केंद्राची वाढ

## मतदारांनी मतदार यादीत नावे, केंद्र तपासून घ्यावीत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : २५२ पंढरपूर विधानसभा मतदारसंघातील सर्व मतदार नागरिकांना आवाहन करण्यात येते की, मा. भारत निवडणूक आयोगाने दि. ०१ जुलै या अर्हता दिनांकावर आधारीत मतदार याद्यांचा विशेष पुनरिक्षण कार्यक्रम घोषीत केलेला आहे. त्यानुसार मतदान केंद्राच्या नवीन, स्थलांतरीत, नावात बदलाबाबत निर्णय घेण्यात आलेले आहेत. पुर्वी मतदार संघात ३३७ मतदान केंद्रे होती. यात नवीन २० वाढीव मतदान केंद्राची भर पडली आहे. त्यानुसार आता ३५७ मतदान केंद्र तयार झाली आहेत.

मतदारांनी आपली नांवे, फोटो, पत्ता व इतर बाबी मतदार यादीमध्ये तपासून घ्याव्यात, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे यांनी दिली.

### निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे

सचिन इथापे म्हणाले की, मतदारांनी आपली नांवे मतदार यादीत आहे किंवा कसे याबाबत मतदारांनी खात्री करुन घ्यावी. १८ वर्ष पूर्ण झालेल्या व त्यावरील सर्व नागरिकांनी आपले नांव मतदार यादी फॉर्म ६ भरुन नांव नोंदणी करावी.

ज्या मतदान केंद्रावर, एकाच कुटुंबातील मतदार यादीतील नांवे इतर मतदान केंद्रात विखुरलेले असल्यास त्यांनी त्या मतदान केंद्रावर नांवे आणण्यासाठी फॉर्म ८ भरावेत. त्यामध्ये मतदान केंद्रास नव्याने जो अनुक्रमांक देण्यात आलेला आहे, तो अचूक पध्दतीने फॉर्ममध्ये भरण्यात यावा. त्यासाठी वेबसाईटवर प्रतिष्दी केलेल्या मतदान केंद्राच्या वादीचा आधार घेण्यात यावा. लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या मतदानांदिवशी ज्या मतदारांची नांवे मतदार यादीत आढळून आलेली नाहीत. अथवा वगळलेली गेलेली असल्याने ज्या मतदारांना मतदान करता आले नाही, अशा मतदारांची पडताळणी करण्यात आली आहे. अशा मतदाराकडून फॉर्म नं ६ भरुन घेऊन त्यांची नांवे नव्याने समाविष्ट करण्यात आलेली आहेत.

# नवरात्र महोत्सव : श्री विठ्ठलास अलंकार, रूक्मिणी मातेस पारंपारिक तुळजाभवानी माता पोषाखासह अलंकार परिधान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर /प्रतिनिधी : घटस्थापनेपासून नवरात्र महोत्सवास सुरवात होत आहे. या निमित्त दुपारी दरवर्षी प्रथा परंपरेप्रमाणे सहाव्या दिवशी श्री विठ्ठल व माता रुक्मिणीला पारंपारिक पोषाखासह अलंकार परिधान करण्यात आले आहेत. त्यामध्ये रूक्मिणी मातेस तुळजाभवानी माता पोषाख परिधान करण्यात आला असल्याची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

श्री विठ्ठलास सोन्याचा मुकुट, कौस्तुभ मणी, दंडपेठ्या जोड, हिऱ्यांचा कंगनजोड, नाम इमिटेशनचा, मोत्याचा तुरा, मोत्याची कंठी, शिरपेच, मत्स जोड, तोडे जोड, जवेची माळ, तांदळया हार, एकदाणी, तुळशीची माळ, हायकोल , सूर्यकळ्याचा हार तसेच रुक्मिणी मातेस सोन्याचा मुकुट, जडावाचा हार, खड्याची वेणी, पाचूची गरसोळी, हिरवी चिंचपेटी, पावड्याचा हार, दशावतारीहार, ठूशी, लहान सरी, सोन्या मोतीची तानवड जोड, सूर्य, पेट्याची बिंदी, मन्यामोत्याच्या पाटल्या जोड, सोन्याचे बाजूबंद जोड, मत्स्य जोड, रुळजोड, पैंजणजोड, मोठी नथ, कर्णफुले जोड, तारामंडल अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत.

तसेच राधिका मातेस नक्षी मुकुट, मोहरांची माळ, तांबडी चिंचपेटी, जव्याची माळ, हायकोल व सत्यभामादेवीला नक्षी टोप, लक्ष्मी हार, जवमनी पदक, जवेची माळ, पुतळ्याची माळ इत्यादी अलंकार व प्रथा परंपरेप्रमाणे पोशाख परिधान करण्यात आलेले आहेत.

तसेच मंदिर समितीच्या अख्त्यातरीत असलेल्या पंढरपूर शहर व परिसरातील लखुबाई, अंबाबाई, पद्मावती, यल्लमादेवी, यमाई-तुकाई माता आदी परिवार देवतांना देखील पारंपारिक पोषाख करण्यात आल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले.

# लोककलावंत शांताबाई गडपाईले यांना इंदापूर तालुक्यात आदरांजली अर्पण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे :

कशाला मी जाऊ कुणाच्या
गटात, सुखी आहे मी माझ्या भिम
ाच्या झोपडीत, कशाला करु कुणाची
हांजी हांजी, स्वाभिमानी माणसं
आहेत माझी




असा आपल्या गायिकेच्या माध्यमातून संदेश देणाऱ्या लोककलावंत माई उर्फ शांताबाई राजाराम गडपायले यांचे वृद्धापकाळाने सप्टेंबर महिन्यात निधन झाले. त्यांचे पती महाकवी, गायक राजानंद गडपायले यांना भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी गौरविले होते. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी गौरवलेले एकमेव कवी, गायक म्हणून त्यांचे नाव अजरामर झाले. या दांपत्याने आंबेडकरवादी चळवळ गतिमान व मजबूत करण्याचे महान कार्य केले. पतीच्या पश्चात व मुलाच्या निधनानंतर ही गावोगावी जाऊन शांताबाई यांनी प्रबोधन केले. तिन पिढ्यांच्या लोकांसोबत काम करण्याची संधी त्यांना मिळाली. व वयाच्या ९५ व्या वर्षी निधन झाले. घाटकोपरला झालेले रमाबाई नगर मधील हत्याकांड व मराठवाडा विद्यापीठ नामांतराच्या लढाईत आपल्या शाहिरी च्या माध्यमातून चळवळीची ज्योत तेवत ठेवली. आंबेडकरवादी चळवळीतील या दांपत्याने योगदान अनन्यसाधारण आहे.

अशा माई उर्फ शांताबाई राजानंद गडपायले यांच्या निधनाबद्दल रविवार दि. ६ ऑक्टोंबर २०२४ रोजी इंदापूर तालुक्यातील वालचंदनगर येथे महात्मा फुले व डॉ बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन(ग्रामपंचायत हॉल) मध्ये मी आंबेडकरवादी सामाजिक संघटनेच्या वतीने अभिवादन सभा आयोजित केली होती. यावेळी आंबेडकरवादी चळवळीतील ज्येष्ठ नेते विकासदादा धाईंजे, मी आंबेडकरवादी सामाजिक संघटनेचे सुरजभैय्या वनसाळे,प्रा.डॉ.अरूण कांबळे, रिपाइंचे तालुका अध्यक्ष बाळासाहेब सरवदे, पत्रकार प्रमोद शिंदे, विशेष सरकारी वकील ड. अमोल सोनवणे यांनी भाषणातुन त्यांचा जीवनपट उलगडून आदरांजली वाहिली तत्पूर्वी प्रास्ताविक जेष्ठ पँथर सु.ग. साबळे यांनी केले तसेच सुत्रसंचालन सुध्दा त्यांनी केले.

यावेळी महाराष्ट्राचे लाडके गायक विजय सरतापे, शाहिद जितेंद्र धाईंजे, गायक राहुल क्षिरसागर, गायक बाळासाहेब सरवदे, गायक दिलीप भोसले यांनी गीतांच्या माध्यमातून काव्यरुपी पुष्पांजली वाहीली. यावेळी प्रा.सर्वगोड सर,मी आंबेडकरवादी सामाजिक संघटनेचे अनिल केंगार, सौरभ धनवडे, सोनु मोरे, अशोक मिसाळ,बौद्ध धम्म प्रसारक आनंद फरतडे, किशोर काळे तसेच अनेक लोककलावंत, भिमसैनिक उपस्थित होते.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुरज वनसाळे, सु.ग. साबळे, विजय सरतापे, राहुल क्षिरसागर यांनी प्रयत्न केले.

# अंढेरा पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष ठाणेदार विकास पाटील यांची उल्लेखनीय कामगिरी

## हरवलेले, चोरी गेलेले तब्बल ४० मोबाईल मूळ मालकास शोधून केले परत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

चिखली प्रतिनिधी/ कैलास आंधळे



अंढेरा पोलीस स्टेशनच्या हद्दीतील चोरी गेलेले, हरविलेले, गहाळ झालेले तब्बल ३५ ते ४०अँड्रॉइड मोबाइलचा शोध घेऊन मूळ मालकास अंढेरा पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष ठाणेदार विकास पाटील आणि त्यांच्या टीमने परत दिले. अंढेरा पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये ४८ गावांचा समावेश असून पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये कायदा , सुव्यवस्था व शांतता राहावी यासाठी ते नेहमीच तत्पर असतात त्यांच्या चालू असलेल्या कार्यकाळात धार्मिक सण ,उत्सव, महामानवांच्या ,महापुरुषांच्या जयंत्या व इतर राजकीय, सामाजिक कार्यक्रम कायदा व सुव्यवस्था राखत शांततेत पार पडत आहे. गावामध्ये चोरी किंवा इतर विपरीत घटना घडू नये म्हणून पोलीस स्टेशनच्या हद्दीमधील काही गावांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले. सोशल मीडियावर जागृतीचे व्हिडिओ अपलोड करून लोकांमध्ये जागृती निर्माण करण्याचे काम सुद्धा ते करत आहे. या अगोदर हद्दीतील गावातील काही लोकांचे मोबाईल चोरी गेलेले होते. काहींचे हरविले होते. गर्दीचे ठिकाणाहून ,बाजारातून, यापूर्वी काही मोबाईल चोरी सुद्धा गेले होते. चोरीला केलेल्या मोबाईलचा शोध घेण्याचे आव्हान पोलिसांसमोर होते. चोरी गेलेल्या किंवा हरवलेल्या मोबाईल मधील काही महत्त्वाची माहिती, फोन नंबर ,फोटो व इत्यादी जपून ठेवलेली माहिती घेऊन काही लोक त्याचा गैरफायदा घेऊ शकतात याची भीती मोबाईल हरवणाऱ्या व्यक्तीला , मोबाईल चोरी गेलेल्या व्यक्तीला होती.मोबाईलचा शोध घेण्यासाठी काही लोकांनी अंढेरा पोलीस स्टेशनला तक्रारही दाखल केली होती. याची दखल घेत ठाणेदार विकास पाटील यांनी तपास चक्रे फिरवित अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून हरविले व चोरी गेलेले मोबाईल हे महाराष्ट्रातील वेगवेगळ्या ठिकाणी वापरत असल्याचे दिसून आले. त्यानुसार मोबाईल आयएमइआय नंबर ,लोकेशन ट्रेस करण्यास इतर अत्याधुनिक तांत्रिक माहितीवरून त्यांनी ४० मोबाईल शोधून काढून त्याचे लोकेशन चोरी किंवा हरवले गेले त्या लोकांच्या स्वाधीन अंढेरा पोलीस स्टेशन येथे केले. चोरी गेलेले, हरवलेले मोबाईल परत मिळाल्यामुळे मोबाईलच्या मूळ मालकांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला. या मोहिमेत अंढेरा पोलीस स्टेशनचे ठाणेदार विकास पाटील ,दुय्यम ठाणेदार सुरेश जारवाल, बीट जमदार कैलास उगले, रामेश्वर आंधळे ,बीट जमदार गणेश देढे,गोरख राठोड ,गजानन वाघ,किशोर जाधव ,खारडे ,नेमाने ,गिरी, गवई इत्यादी पोलीस कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

# शिरोळ तालुक्यात विधानसभा निवडणुकीचे वातावरण तापू लागले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : शिरोळ तालुक्यावर संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष असते. शिरोळ तालुक्यात कोण आमदार होणार आता चर्चा रंगू लागलेले आहेत. जागोजागी नागरिकांच्या बैठक होत आहेत.

कोल्हापूर जिल्ह्यात अनेक मातंबरांनी तर्क,वितर्क लावण्यास सुरुवात केलेली आहे. अनेक कार्यकर्ते आमचाच साहेब आमदार होणार असे बोलले जात आहे.

अनेक दिग्विज नेते शिरोळ तालुक्यात आपली सत्ता आणण्यासाठी बैठका घेत आहेत. चक्क एका कार्यकर्त्याने आपला साहेब आमदार झाल्याबद्दल गुलाल लावलेला आहे.

# राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या वतीने गुणिजनांचा सत्कार




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/कळंब : सुधाकर रणदिवे : गुणिजनांच्या सत्काराचे आयोजन राष्ट्रीय ओबीसी महासंघ धाराशिव च्या वतीने पर्याय सामाजिक संस्था कळंब या ठिकाणी करण्यात आले होते .

याबाबत सविस्तर वृत्त असे की, कळंब तालुक्यातील पर्याय सामाजिक संस्थेत राष्ट्रीय ओबीसी महासंघ व राष्ट्रीय ओबीसी कर्मचारी अधिकारी महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने सावित्रीबाई फुले राज्य शिक्षक पुरस्कार प्राप्त श्री सुखदेव भालेकर आणि महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगामार्फत उपजिल्हाधिकारी पदाला गवसणी घालणारे श्री किरण डाके यांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले. अनिक फायनान्स लिमिटेडचे चेअरमन आणि पर्याय सामाजिक संस्थेचे संस्थापक, वंचित ,पीडित ,कष्टकरी, एकल महिला ,भटक्या विमुक्त ,आदिवासी,आणि दिन दलितांचे कैवारी सन्माननीय विश्वनाथ अण्णा तोडकर यांच्या शुभहस्ते हा कार्यक्रम पार पडला. यावेळी ओबीसी संघर्ष योद्धा श्री संतोष वीरकर यांचाही सन्मान करण्यात आला.

राष्ट्रीय ओबीसी महासंघाचा पदाधिकारी म्हणून काम करत असतानाच शाळेतील विद्यार्थी आणि शिक्षण यावर अधिक लक्ष केंद्रित करत शाळेत वेगवेगळे उपक्रम राबवून विद्यार्थ्यांप्रती आणि समाजाप्रती बांधिलकी जोपासत काम केले असल्याचे यावेळी राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक तथा राष्ट्रीय ओबीसी कर्मचारी अधिकारी महासंघाचे प्रदेश उपाध्यक्ष सन्माननीय सुखदेवजी भालेकर यांनी यावेळी सांगितले तर शिक्षकी पेशात कार्यरत असूनही आपल्यातील अधिकारी बनण्याची उर्मी स्वस्थ बसू देत नव्हती. अधिकाऱ्यांचे गाव असलेल्या उपळाई बुद्रुक या गावात काम करत असल्यामुळे तेथील प्रेरणा घेऊनच मी गेली दहा वर्ष सातत्याने या यशासाठी प्रयत्न करत अखेर हे यश मिळवले असे यावेळी उपजिल्हाधिकारी पदाला गवसणी घालणाऱ्या श्री किरण डाके यांनी यावेळी उपस्थितांना सांगितले. अंतरवाली सराटी येथे सतत नऊ दिवस उपोषण करणारे संघर्ष योद्धा श्री संतोष वीरकर यांनीही उपोषणादरम्यान घडलेल्या विविध घटनांचा आढावा यावेळी उपस्थिताना सांगितला. काळ कठीण आहे. समाजा समाजात दरी निर्माण होत आहे. यावेळी आपण आपल्या अधिकारापासून हक्कापासून दूर जात आहोत. यावेळी सजग आणि जागृत राहून आपण आपले हक्क अबाधित ठेवले पाहिजेत, आपल्या भविष्यातील पिढ्यांसाठी हा संघर्ष आपल्याला करणे भाग आहे. संविधानाचे रक्षण करून झुंडशाहीला थोपवणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे असे यावेळी श्री संतोष वीरकर यांनी सांगितले.

तर सन्माननीय विश्वनाथ अण्णा तोडकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करत सांगितले की ही लढाई जाती जातीची नाहीच. तर ती विस्थापित आणि प्रस्थापितांची लढाई आहे. प्रत्येक समाजामध्ये गरीब आणि श्रीमंत ही दरी कायम आहे. उपेक्षित आणि वंचितांना न्याय मिळवून देण्यासाठी आपल्यासारख्या सर्व सुशिक्षितांनी एकत्र येऊन काम करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन अण्णांनी यावेळी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय ओबीसी कर्मचारी अधिकारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष श्री संतोष भोजने यांनी तर आभार प्रदर्शन मराठवाडा अध्यक्ष पैलवान दीपक जाधव यांनी केले. कार्यक्रमासाठी राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष ज्योतीराम बप्पा कोरे, संतोष चौगुले ,सरचिटणीस सतीश वैद्य यांच्यासह तालुकाध्यक्ष शंकर कराड सावता माळी जि प सदस्य तानाजी माळी यांनी प्रयत्न केले.

कार्यक्रमास लातूरहून विजयकुमार पिनाटे, लक्ष्मण दावनकर, हिरालाल पाटील ,भारत काळे तर धाराशिव जिल्ह्यातील बालाजी माळी ,अशोक खडके, राजेंद्र लोहार, सिद्धेश्वर कुंभार, ज्ञानेश्वर घोडके, नामदेव वाघमारे,सुहास दराडे, डॉ,राहुल झेडगे, रंगनाथ दुधाळ,प्रदीप माळी,सचिन भांडे, दिलीप मेहेत्रे ,सावता माळी,भास्कर कांबळे पांडुरंग लोकरे, सचिन डोरले,गोपाळ माळी, महादेव गाढवे,अतुल लोहार, खंडू घुले ,अशोक चिंचकर, सावता माळी पळसप , भुजंग लोकरे, दादासाहेब कोळी यांच्यासह ओबीसी समाजातील समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रामपूर येथे मोफत वीज योजनेतील शेतकऱ्यांना शून्य बिलांच्या पावतीचे वितरण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा /प्रतिनिधी : मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजने अंतर्गत शेतकऱ्यांना शेती पंपाचे चालू वीज बिल (एप्रिल ते जून २०२४चे ) शून्य बिल पावती देयके महावितरण कडून उमरगा तालुक्यातील येळी,रामपूर येथे वाटप करण्यात आले आहे.

मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजनेअंतर्गत राज्य सरकारने शेतकऱ्यांचे कृषी पंपाचे चालू बिल भरण्याचा निर्णय घेतल्यामुळे शेतकऱ्यांना मोफत वीज मिळत आहे, आगामी पाच वर्ष सरकार शेतकऱ्यांचे चालू वीज बिल भरेल असा शासन निर्णय जारी झाला आहे.

दिलेला शब्द आज सरकाने पूर्ण केल्याने उमरगासह, येळी,रामपूर सह तालुक्यातील शेतकऱ्याना आनंद होताना दिसून येत आहे.

उमरगा तालुक्यातील शेतकरी राज्य सरकारसह महावितरणचे कौतुक करत असल्याचे दिसत आहे.



सोमवारी रामपूर येथे शेतकऱ्यांना महावितरण कडून शून्य वीज बिलाच्या पावत्या वाटप करण्यात आले, यावेळी महावितरणचे सहाय्यक अभियंता सतीश सिंदगी, लाईनमन मोहन गुरव, यांच्या हस्ते शेतकऱ्यांना विज बिल पावत्या वाटप करण्यात आले. या वेळी रामपूर सरपंच जानकाबाई भोसले, उपसरपंच संतोष भोसले, विष्णू भोसले, अनंत भोसले, सतीश भोसले, नितीन सुरवसे, येळीचे सरपंच निवृती पवार, रामलिंग बिराजदार, केशव सांगुळगे,प्रवीण भोसले, दयानंद हिंडोळे, धोंडिबा भोसले, प्रदीप भोसले,जनिमिया तांबोळी, किरण पवार यांच्यासह येळी, रामपूर येथील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### हर्षवर्धन पाटील यांची एंट्री होताचं झाली गळतीला सुरवात

### जगदाळे, माने आणि शहा यांचा नाराजीचा सूर

# शरद पवारांचा पक्ष फुटला, निष्ठावंत नेत्यांनी पुकारले बंड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी / अतुल सोनकांबळे : इंदापूर तालुक्यातील येणाऱ्या विधानसभेतील निवडणुकीसाठी उमेदवार हा आपल्याच गटातील कोणीही चालला असता असे वक्तव्य ज्येष्ठ नेते आप्पासाहेब जगदाळे यांनी केले.

ते म्हणाले की वेळोवेळी आम्हाला शांत करून आम्हाला नको असलेला उमेदवारच प्रत्येक वेळेस दिला जातो आणि आम्ही प्रामाणिकपणे जनतेची सेवा केली तरीही आमच्यावर तिकीट न देता अन्याय केला आहे .त्यामुळे आम्ही हर्षवर्धन पाटील या उमेदवाराला विरोध करणार आहे. इंदापूर तालुक्यातील जनतेला आजी आणि माजी दोन्हीही आमदारावरती विश्वास राहिलेला नसल्यामुळे तिसरा नवीन चेहरा द्यावा अशी सर्व जनतेची मागणी असतानाही पवार साहेबांनी नको असलेल्या चेहऱ्याला प्रवेश दिल्यामुळे भरत शेठ शहा , प्रवीण भैय्या माने आणि आप्पासाहेब जगदाळे हे नाराज असल्याचे समजत आहे. त्यांनी शरद पवार गटाला ११ तारखेपर्यंत आपला निर्णय बदलायचा अल्टिमेटम दिलेला आहे. जर पवार साहेबांनी नवीन उमेदवार बदलला नाही तर आपण वेगळा विचार करणार असल्याचे त्यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

थोडक्यात सांगायचे म्हणजे हर्षवर्धन पाटील यांना शरद पवार गटातील बऱ्याचशा लोकांना विरोध असल्याचे चित्र समोर उभे राहत आहे. आप्पासाहेब जगदाळे, प्रवीण भैय्या माने व भरत शेठ शहा यांचा काही असेल तो निर्णय ११ तारखेच्या मेळाव्यात घेतला जाईल असे त्यांनी सांगितलेले आहे. गेली ३५ वर्षापासून आम्ही जनतेची सेवा करत आहोत आणि पुढेही करणार आहे त्यामुळे जनता जो निर्णय घेईल तो आम्हाला मान्य असेल असे वक्तव्य आप्पासाहेब जगदाळे यांनी केले.

